# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०३.०५.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ११.०४.२०२६ चे १९.०० वा. ते १२.०४.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे राणाप्रतापनगर हद्दीत गोवर्धन अपार्टमेन्ट, जयताळा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी धिरज प्रमोद मडके, वय २७ वर्षे, यांनी त्यांची होन्डा स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम.एच. ४० बि.यु. ६७५५ किंमती ६०,०००/—रू. ची ही पार्कींगमध्ये पार्क करून लॉक करून, ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची मोटरसायकल चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून दिनांक ०२.०५.२०२६ रोजी १६.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, बाजार चौक जयताळा येथे सापळा रचून चोरीचे मोटरसायकलसह आरोपी नामे हर्ष उर्फ एक्का महेंद्र रामटेके, वय २४ वर्षे, रा. गौतम बुध्द वार्ड, खैरलांजी रोड, तिरोडा, जि. गोंदिया यास ताब्यात घेतले. आरोपीस विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी जवळील बॅगची पंचासमक्ष झडती घेतली असता, बॅगेमध्ये रोख ५,००,०००/—रू. व सोन्या—चांदीचे दागीने असा मुद्देमाल मिळून आल्याने आरोपीचे ताब्यातून एकुण किंमती ८,९५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आललो आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी राणाप्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नवीनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (अति.प्रभार, डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. भरत कऱ्हाडे, सपोनि. सचिन गायकवाड, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. युवानंद कडु, नारायण पारवेकर, पोअं. रवि राऊत, प्रफुल पारधी, विरेंद्र पांडे, लक्ष्मीकांत सोनटक्के, दिनेश महल्ले, निलेश श्रीपात्रे व हंसराज ठाकुर यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे पाचपावली :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०३.०५.२०२६ चे ००.४० वा. सुमारास, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, वैशाली नगर, आंबेडकर गार्डन जवळील रेल्वे लाईनचे रोडवर एक ईसम शस्त्र हातात घेवुन, लोकांना शिवीगाळ करून धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरून नमुद

ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम हातात लोखंडी चाकु घेवुन धुमधाम करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व निशस्त्र केले. आरोपीस नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव तुषार उर्फ पित्तु किरण पराते, वय १९ वर्षे, रा. ठक्करग्राम, महादेव मंदीरजवळ, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती अंदाजे ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष धुमधाम करतांना मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. पवन भटकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे सपोनि. प्रमोद सोनवणे यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कपीलनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.०५.२०२६ चे १५.०० वा. ते ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, प्लॉट क्र. ९६, मसाळा टोली, रजा टाऊन, नाका नं. ०२, नागपुर येथे राहणारे फिर्यादी सुनिल तुळशीराम बचाले, वय ३६ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह लग्न समारंभाकरीता भिलगाव, कामठीरोड येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २,००,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,२७,६००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि. जयराम देशमुख ८४५९४४०९९८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे अंबाझरी :— गंभीर अपघात करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.०५.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे मित्र नामे विजू उर्फ विजय महादेव उईके, वय ५५ वर्षे, व त्यांचा मुलगा गिरीष विजू उईके, वय १३ वर्षे, दोन्ही रा. पंकज नगर, फुटाळा, हिंदुस्थान कॉलोनी, नागपूर हे त्यांचे स्कुटी दुचाकी क्र. एमएच ३१ ई.जे. ८७२३ ने पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, फुटाळा चौक, डिग्री विअर शॉपी समोरून जात असता, चार चाकी वोल्स वॅगन कार क्र. एम.एच. ४० सि.क्यु. ४००४ चा चालक आरोपी नामे अनिकेत चंद्रशेखर चौधरी वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. ०३, शारदामाता नगर, दत्तवाडी, नागपूर याने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मित्राचे स्कुटीला मागुन धडक देवून, त्यावरिल दोघांनाही गंभीर जखमी केले. जखमी यांना उपचाराकरीता आयकॉन हॉस्पीटल येथे दाखल केलेले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी राहुल रामप्रसाद देशमुख वय ३५ वर्षे, रा. पंकज नगर फुटाळा, हिंदुस्थान कॉलोनी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून मसपोनि. मिना बारंगे ९५२७४७५२१७ यांनी पोलीस ठाणे अंबाझरी येथे कार चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १२५(अ), १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | अप. क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०८, नागपुर. | पोलीस ठाणे बेलतरोडी २३२/२०२४ | कलम ३९२, ३४ भा.दं.वि. | हैदर अली अकरम अली वय २३ वर्षे, रा. वार्ड नं. १४, धोबीपारा, खरीयार रोड, पो.स्टे. जोक, जि. नौपारा, राज्य. ओरीसा | ०६.०५.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**